# “महाराष्ट्रातील विद्यापीठा अंतर्गत विधी महाविद्यालय ग्रंथालयातील माहिती साक्षरता : एक अभ्यास”

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## अंतर्गत

## ग्रंथालय व माहितीशास्त्रातील पीएच. डी. (आचार्य)

## पदवीसाठी सादर केलेला संधोधन आराखडा


***संशोधक***

**सय्यद अनीस मोईनोद्दीन**

**(M. Lib. & I.Sc. SET)**

***मार्गदर्शक***

**डॉ. विलास अशोकराव काळे**

**ग्रंथपाल**

**स्वातंत्र सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पुर्णा (जं.)**

**ता. पूर्णा जि. परभणी.**


**डिसेंबर २०२०**

## “महाराष्ट्रातील विद्यापीठा अंतर्गत विधी महाविद्यालय ग्रंथालयातील माहिती साक्षरता : एक अभ्यास”

**प्रस्तावना :-**

२१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे व त्या आधुनिक युगात माहितीचा परीस्फोट झालेला आहे. माहितीचे ज्ञानात रुपांतर झाल्यामुळे विविध साहित्य हे इलेक्ट्रॉनिक स्वरुपात उपलब्ध आहे. त्या माहितीतून नेमकी माहिती मिळवणे व ती योग्य प्रकारे वापरण्यासाठी विषय कौशल्याची गरज भासत आहे. म्हणून माहिती साक्षरता क्षमता या नवीन संकल्पनेकडे या समस्येवर उपाय म्हणून पाहिले जात आहे.

विशेषत: इंटरनेटच्या उपलब्धतेमुळेही माहिती साक्षरतेला आणखी महत्व प्राप्त झाले आहे. आजच्या मानवी जीवनात माहितीला फार मोठ्या प्रमाणात महत्व प्राप्त झाले आहे. ज्याप्रमाणे अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टी आवश्यक आहेत त्याप्रमाणेच माहिती आवश्यक आहे. प्रत्येकाला आपापल्या क्षेत्राचा विकास करण्यासाठी आपापल्या विषयाची माहिती आवश्यक आहे व त्या माहितीच्या आधारे आपण यशाचा कळस गाठू शकतो. आज माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे फार मोठ्या प्रमाणात माहिती निर्माण होत आहे. निरंतर शिक्षणाचा महत्वाचा घटक ही माहिती आहे. कारण दैनंदिन व्यवहार विभिन्न क्षेत्रात घडत असलेल्या निरनिराळ्या घटना विविध विषयावर निरंतरपणे सुरु असलेल्या संशोधनात प्रक्रिया या माध्यमातून सतत माहिती निर्मिती होत असते व ती माहिती बौध्दिक विकासासाठी, ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी आणि समाजाच्या विकासासाठी माहितीचा सातत्याने प्रसार करण्यात यावा कारण माहिती ही परिस्थिती जाणून घेते.

देशात जागरुक नागरिक निर्माण करण्यासाठी माहिती साक्षरता फार महत्वाची बाब आहे. सध्या ग्रंथालयाचे संगणकीकरण व आधुनिकीकरण होत आहे. विद्यार्थ्यांना इंटरनेटद्वारे ऑनलाईन व ऑफलाईन सेवा दिल्या जात आहेत. तालिका पाहण्यासाठी opac ची व्यवस्था आहे. परंतू या सर्व सुविधा देत असताना जन वाचकांना संगणक हाताळता येत नसेल व संगणकावरील opac मधून त्यांना हव्या असलेल्या वाचन साहित्याचा शोध घेता येत नसेल, तर ग्रंथालयातील कितीही समृध्द व आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केला असता तर तो निरर्थक ठरतो. माहिती साक्षरता हा एक समाजाचा अंगभूत घटक आहे. तसेच समाजाच्या प्रगतीला हातभार लावणारा घटक आहे. पूर्वी ज्याला वाचता - लिहीता येते त्याला साक्षर म्हणत. परंतू आता त्याला संगणक हाताळता येत नसेल, तर या माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात वावरणाऱ्या त्या

व्यक्तीस निरक्षर मानले जाते. आजच्या स्पर्धात्मक युगात माहितीचे महत्व व त्याची उपयुक्तता सर्वांनाच पटलेली आहे. सतत वाढणाऱ्या माहितीचा प्रभावी वापर करता यावा, यासाठी माहिती साक्षरता आवश्यक असते. माहिती साक्षरता हा शब्द माहिती आणि साक्षरता या दोन शब्दांपासून तयार झालेला आहे.

माहिती साक्षरतेचे शैक्षणिक कार्यक्रम राबवताना ग्रंथपाल समूहास भागीदार म्हणून महत्व देण्यात आलेले आहे. तसेच आज माहिती तंत्रज्ञानाचा वापर सामाजिक संस्था करु लागल्यामुळे माहिती साक्षर नागरिक बनविण्यापूर्वी कधी न लक्षात आलेली जबाबदारी ही शैक्षणिक ग्रंथपालांनाच पार पाडावी लागणार हे स्पष्ट दिसत आहे. ग्रंथपाल हे दुहेरी जबाबदरी लक्षात घेतात. माहिती ते साक्षरता अभियान या अभ्यासक्रमात शिक्षकांची भुमिका यशस्वीपणे पार पाडावयाची असेल तर ग्रंथपालांनी या क्षेत्रात पारंगत असणे गरजेचे आहे. त्या दृष्टिकोनातूनच माहिती साक्षरतेचे सखोल ज्ञान विद्यार्थ्यांना मिळते. म्हणूनच प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी संशोधकाने ‘‘महाराष्ट्रातील विद्यापीठा अंतर्गत विधी महाविद्यालय ग्रंथालयातील माहिती साक्षरता : एक अभ्यास’’ हा विषय निश्चित केला आहे.

**विषय :**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत ग्रंथालय व माहितीशास्त्रातील आचार्य (पीएच.डी) शिक्षण क्रमासाठी असलेल्या संशोधन प्रकल्पाकरीता संशोधकाने ‘‘महाराष्ट्रातील विद्यापीठा अंतर्गत विधी महाविद्यालय ग्रंथालयातील माहिती साक्षरता : एक अभ्यास’’ हा विषय निवडला आहे.

**पूर्व साहित्याचा अभ्यास :**

प्राचीन काळापासून आजच्या इंटरनेटच्या युगापर्यंत माहिती ही दूरवर पसरलेली आहे. लोकसमुदायातील वैचारिक व भावनात्मक दळणवळण घडवून आणण्याचे एक साधन म्हणून ग्रंथाचे स्थान महत्वाचे आहे. आधुनिक काळात मानावाच्या कल्पनांची, विचारांची, भावनांची आणि अनुभवांची ग्रंथ ही शिदोरी आहेत. ही शिदोरी ग्रंथालय मंदिरात जतन केली जाते. १९८० पासून अमेरिकेमध्ये या विषयाच्या शैक्षणिक स्तरावर अभ्यास करण्यात येतो. अमेरिकन ग्रंथालय संघटनेने माहिती साक्षरतेसाठी प्रमाणक ठरवून दिलेले आहे. व्यवस्थापक, ग्रंथपाल आणि प्राध्यापक माहिती साक्षरता राबवून घेतात. कारण मानवी जीवनात ग्रंथाचे महत्व अनन्य

साधारण आहे. आज महाराष्ट्रात अनेक प्रकारच्या विद्याशाखा असून त्यांची व्याप्ती ही त्यांच्या विषयापूरतीच मर्यादित असून ते आपापल्या क्षेत्राचा अभ्यास करत असतात. त्यातच विधी विद्याशाखा म्हणून महाराष्ट्रातील विद्यापीठात हा अभ्यासक्रम चालविला जातो. विधी अभ्यासक्रमामध्ये विविध क्षेत्राशी निगडीत अशा कायद्यांचा अभ्यास केला जातो. ग्रंथालयाचा व विधी शाखेचा परस्पर संबंध आहे. आपल्या देशामध्ये ग्रंथालयाच्या संकल्पना बदलत आहेत. उदा. वर्च्युअल ग्रथालय, डिजिटल ग्रंथालय, हायब्रीड ग्रंथालय इत्यादी प्रकारचे ग्रंथालये निर्माण होत आहेत. त्याबरोबरच मल्टिमीडीया व इलेक्ट्रॉनिक मिडीया या माध्यमांचा वापर सुरु झाला आहे. परंतू त्यामानाने त्यांच्याबद्दल माहिती मिळविण्या विषयी जागरुकता निर्माण झालेली नाही व अशा प्रकारची नवीन माहिती मिळवण्याचे स्त्रोत, साधने, तंत्रज्ञान यांची ओळख व त्यांच्या वापरासंबंधी प्रशिक्षण देणे, संशोधक निर्माण करणे ह्या ग्रंथालया पुढील समस्या आहेत. ह्या समस्या लक्षात घेऊन संशोधकाने सदर विषय संशोधनासाठी निवडला आहे. तसेच या विषयाची निवड करण्याचे दुसरे कारण म्हणजे, माहिती साक्षरता अभियान ग्रंथालयात कसे राबविता येते हे संशोधन प्रकल्पाच्या आधारे स्पष्ट होते. त्यामुळे या व्यवसायातील ग्रंथपाल, ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना तसेच विद्यार्थ्यांना माहिती साक्षरतेबद्दल सदर शोध प्रकल्प निश्‍चित उपयोगी व प्रेरणादायी ठरेल.

**उद्दिष्टे :**

कोणत्याही संशोधन प्रकल्पाची काही ठराविक उद्दिष्टे असतात. ती उद्दिष्टे संशोधन प्रकल्प निवडतांना स्पष्ट करावी लागतात. त्यासाठी प्रस्तुत संशोधनात “महाराष्ट्रातील विद्यापीठा अंतर्गत विधी महाविद्यालय ग्रंथालयातील माहिती साक्षरता : एक अभ्यास” या विषयीचा अभ्यास करताना संशोधकाने पुढील उद्दिष्टे समोर मांडली आहेत.

१) विधी महाविद्यालयाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेणे.

२) माहिती साक्षरता अभियान राबवण्यात ग्रंथालय व ग्रंथपाल यांच्या योगदानाबद्दल अभ्यास करणे.

३) विधी महाविद्यालय ग्रंथालयातील माहिती साक्षरता राबविण्याच्या विविध पध्दतींचा चिकित्सक अभ्यास करणे.

४) विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांमध्ये व कर्मचाऱ्यांमध्ये माहिती साक्षरते विषयीचा अभ्यास करणे.

**गृहीतके :**

संशोधन हाती घेतल्यानंतर त्या संशोधनाची रुपरेषा करताना संशोधनाची गृहीतके मांडावी लागतात ती पुढील प्रमाणे आहेत :

१) विधी महाविद्यालय ग्रंथालयामार्फत माहिती साक्षरतेबद्दल चर्चासत्र, शिबिरे, निबंध स्पर्धा व विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.

२) ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना माहिती साक्षरते सेवे अंतर्गत प्रशिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले जातात.

३) विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना माहिती साक्षरतेचे उपयोग कसे करता येईल या विषयी मार्गदर्शन केले जाते.

४) दृकश्राव्य माध्यमाच्या सहाय्याने ग्रंथालय संबंधी माहिती साक्षरते विषयी माहिती देणारी ध्वनीफित, चित्रफित, स्लाईड्स व ट्रान्सपरन्सीज इत्यादी तयार असतात.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन प्रकल्पात वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार असून त्या संशोधकास कोणत्याही उपक्रमाच्या सद्यस्थितीचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी व विश्लेषणात्मक वर्णन करण्यासाठी संशोधन करण्यात येते. अशा संशोधनास वर्णनात्मक संशोधन असे म्हणतात. संशोधन प्रक्रियेत तथ्य संकलन करण्यासाठी अनेक पध्दती व तंत्रांचा उपयोग केला जातो. केस स्टडी ही सुध्दा एक पध्दती आहे. की ज्यामुळे एखाद्या निश्चित अभ्यासासंबंधी माहिती संकलित केली जाते. प्रामुख्याने एक विशिष्ट व्यक्ती, गट, संस्था तथा समाज यासारख्या बाबींचा यात प्रामुख्याने अभ्यास केला जातो. या संशोधनात माहिती संकलन करण्यासाठी प्रश्नावली या साधन तंत्राचा वापर करण्यात येत आहे.

**ग्रंथपालन व्यवसायातून विषयाचे महत्व :**

माहिती साक्षरता ही आधुनिक काळात महत्वाची आहे. ती ओळखून सदर विषय अभ्यासासाठी निवडला आहे. ग्रंथालयाचे बदलते स्वरुप, वाचकांच्या बदलत्या स्वरुपाची मागणी, माहिती तंत्रज्ञानाचा वापर आणि बहुसंज्ञापनाचा वापर इत्यादी प्रकारच्या ग्रंथालयाच्या कारणांमुळे माहिती साक्षरता राबवणे आवश्यक आहे. ग्रंथालयात माहिती साक्षरतेचे महत्व फार मोठ्या प्रमाणात आवश्यक आहे. एखाद्या गोष्टीबद्दल विचारणा केली जाते त्या गोष्टी ची माहिती हवी असते. प्रत्यक्षात ती मिळाल्यावरच विशेष महत्वाची वाटते. तसेच सतत वाढणाऱ्या

माहितीचा प्रभावीपणे वापर करता यावा यासाठी प्रत्येकाला विविध कारणासाठी माहितीची आवश्यकता असते. आपल्या कार्यात सुसंगतपणा येण्यासाठी किंवा ठेवण्यासाठी संभाव्य अडचणींचा अंदाज घेण्यासाठी माहिती साक्षरता राबवणे आवश्यक आहे. वाचकांना माहिती स्वत: मिळविता यावी तसेच कायद्याच्या व नैतिकतेच्या चौकटीत माहिती मिळवता यावी, त्यांना माहिती साधनांच्या स्त्रोतांची ओळख व्हावी, ते स्वत: माहितीचे महत्व समजतील व त्यामुळे ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांचा बोजा कमी होईल त्याबरोबरच ग्रंथालयातील सेवा देणे सुलभ होईल. या व्यावसायिक दृष्टीकोनातून हा संशोधन प्रकल्प महत्वाचा व प्रेरणादायी ठरेल त्यामुळे सदर विषय हा संशोधनासाठी निवडला आहे.

**व्याप्ती व मर्यादा :**

प्रस्तुत संशोधन प्रकल्प "महाराष्ट्रातील विद्यापीठा अंतर्गत विधी महाविद्यालय ग्रंथालयातील माहिती साक्षरता : एक अभ्यास" हा असून महाराष्ट्रातील राज्य विद्यापीठ अंतर्गत एकुण ८६ विधी महाविद्यालये पुरताच मर्यादीत आहे. त्या महाविद्यालयांची संख्या खालील प्रमाणे आहे :-

| अ. क्र. | विद्यापीठाचे नांव | विद्यापीठ अंतर्गत विधी महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|
| १ | मुंबई विद्यापीठ, मुंबई | २२ |
| २ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | १६ |
| ३ | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | १२ |
| ४ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ०७ |
| ५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | ०७ |
| ६ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | ०६ |
| ७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | ०४ |
| ८ | श्रीमती नाथीबाई दामोधर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई | ०४ |
| ९ | कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव | ०३ |
| १० | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | ०३ |
| ११ | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | ०२ |

यामध्ये महाराष्ट्रातील केंद्रीय विद्यापीठ अंतर्गत येणारे विधी महाविद्यालये, अभिमत विद्यापीठ अंतर्गत येणारे विधी महाविद्यालये व त्याबरोबरच खाजगी विद्यापीठ अंतर्गत येणारे विधी महाविद्यालये ही वगळण्यात आलेली आहेत ही या संशोधन प्रकल्पाची मर्यादा आहे. वरील ८६ विधी महाविद्यालय ग्रंथालयातील माहिती साक्षरता : एक अभ्यास या समस्येचा अभ्यास सदरील संशोधनात करण्यात येणार आहे.

**अनुक्रमाणिका :**


| | |
|---|---|
| ➢ प्रकरण पहिले | प्रस्तावना |
| ➢ प्रकरण दुसरे | पूर्व साहित्याचा अभ्यास |
| ➢ प्रकरण तिसरे | विधी महाविद्यालय ग्रंथालयातील माहिती साक्षरता : एक अभ्यास या विषयाचा सखोल अभ्यास |
| ➢ प्रकरण चौथे | विधी महाविद्यालय ग्रंथालयातील माहिती साक्षरतेचे सर्वांगीण विश्लेषण |
| ➢ प्रकरणे पाचवे | निष्कर्ष व शिफारशी |
| ❖ परिशिष्टे | संदर्भग्रंथ<br>प्रश्नावली<br>छायाचित्रे<br>नकाशे |

## प्रस्तावित कार्य योजना :

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | प्रस्तावित कालावधी |
|---|---|---|
| १ | संशोधन संबंधित साहित्य संग्रह | ६ महिने |
| २ | विधी महाविद्यालयातील ग्रंथालयांना भेट देणे व प्रश्नावली तयार करणे | ६ महिने |
| ३ | माहिती संग्रह आणि मुलाखती | ६ महिने |
| ४ | माहितीचे विश्लेषण आणि व्याख्या | ६ महिने |
| ५ | प्रबंध लेखन | ६ महिने |
| ६ | प्रबंध प्रस्तुतीकरण | ६ महिने |

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) कराडे पी. एम. २००७ सामाजिक संशोधन पध्दती नागपूर : पिंपळापूरे प्रकाशन अँड पब्लिशर्स पृ. ३९८

२) काचोळे, दा. धो. २००५ सामाजिक संशोधन पध्दती, औरंगाबाद : कैलास पब्लिकेशन पृ.२१

३) खेरडे, मोहन : २००६ महाविद्यालयीन ग्रंथालयात माहिती साक्षरता, ज्ञानगंगोत्री.

४) गायकवाड पी. बी. २०१७ महाविद्यालयीन ग्रंथालय आणि माहिती साक्षरता, (AIIRJ).

५) निकोसे सत्यप्रकाश २००७ ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पध्दती, नागपूर : प्रज्ञा प्रकाशन, पृष्ठ ९७ ते १०२

६) पवार, पी. एस. आणि इतर २००२ ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, कोल्हापूर : फडके प्रकाशन पृष्ठ २१४

७) पाटील वा. भा. १९९८ संशोधन पध्दती, नागपूर : श्री मंगेश प्रकाशन पृष्ठ २६

८) पंडित, बन्सी १९८९, शिक्षणातील अधिकल्प, पुणे : नूतन प्रकाशन पृष्ठ २६

९) बाहेती, एस.आर. : २००६ महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये माहिती साक्षरता कार्यक्रम, ज्ञानगंगोत्री.

१०) भितांडे वि. रा. २००५ शैक्षणिक संशोधन पध्दती पुणे : नूतन प्रकाशन पृष्ठ १०६

११) रिसवडकर, म. रा. २०००. संशोधन व्याख्या आणि पध्दती नाशिक : य. च. म. मुक्त विद्यापीठ पृष्ठ क्र. ११

१२) वीर धर्मराज, २००४ ग्रंथ परिवार सार्वजनिक ग्रंथालयातील संग्रह विकास.

१३) शर्मा एस. के. २००१ विशिष्ट ग्रंथालये व शोध पध्दती शास्त्र, कानपूर : पराग प्रकाशन पृष्ठ १५४

१४) संत, दु. का. १९८८ संशोधन पध्दती प्रक्रिया व अंतरंग पुणे : पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पृष्ठ ११६

१५) ज्ञानगंगोत्री संपादकीय, २००३ य. च. म. मू. वी. नाशिक.

16) Deshmukh, Prashant, 2011 Analytical study of literature on information literacy Library, Herald Volume, 49 (4).

17) Gopal M. H. 1970, An Introduction to Research Procedure in Social Science, Bombay : Asia Pub. House P. 74 - 77.

18) Kothari C. R. 1985 Research Methodology Methods Techniques, Nagpur Vishawa Publication, P 141

19) Maiaouthong and others : 2012 The role of University Libraries in supporting the integration of information literacy in course instruction Malaysian, Journal of library science, Vol. 17 (1),.

20) Sidhu, Kulbirsingh, 1992 Methodology of research in Education, New Delhi : Steering Publication, Private

21) http://dolmaharashtra.org.in.

22) www.rtmunagpur.com

23) www.studycircle.co.in

**संशोधकाची स्वाक्षरी**

**सय्यद अनीस मोईनोद्दीन**

(M.Lib & I.Sc. SET)

**मार्गदर्शकाची स्वाक्षरी**

**डॉ. विलास अशोकराव काळे**

ग्रंथपाल

स्वातंत्र्य सैनिक सुर्यभानजी पवार महाविद्यालय,

पुर्णा (जं.) ता. पुर्णा जि. परभणी.